■ e-paper.diwanews.com ■ सोमवार, ३ फेब्रुवारी २०२५ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 www.diwanews.com

वर्ष-४
अंक-२७

# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

माझ्या नजरेतून ठाणे...

# अर्थसंकल्पात नागरिकांचा सहभाग!

## ठाणे महापालिकेचा उपक्रम

## ठाणे महापालिका अर्थसंकल्पासाठी सूचना पाठवण्याचे नागरिकांना आवाहन

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेचा सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रक्रियेत गतवर्षीप्रमाणेच माझ्या नजरेतून ठाणे या उपक्रमांतर्गत नागरिकांचा सहभाग असावा, यासाठी नागरिकांना सूचना पाठवण्याचे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. महापालिकेच्या या कौतुकास्पद उपक्रमात शहरातील नागरिकांनी सहभाग नोंदवून आपल्या विकासाच्या संकल्पना महापालिकेस कळवाव्यात.

ज्या नागरिकांना सन २०२५-२६च्या अर्थसंकल्पाविषयी काही सूचना मांडायच्या असतील त्यांनी शनिवार ०८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत त्या सूचना .. या इमेल आयडीवर पाठवाव्यात. त्याशिवाय, मुख्य लेखा विभाग, दुसरा मजला, महापालिका मुख्यालय, जन. अरुणकुमार वैद्य मार्ग, ठाणे (प.) ४००६०२ या पत्त्यावर लेखी स्वरुपातही पाठवता येतील, अशी माहिती ठाणे महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी यांनी दिली आहे. नागरिकांनी महापालिका अर्थसंकल्पात वेगवेगळ्या सूचना सुचवून आपला सक्रिय सहभाग शहराचा अर्थसंकल्प बनविण्यासाठीच्या प्रक्रियेत सहभाग घेतल्यास महापालिकेचा अर्थसंकल्प अधिक लोकाभिमुख होईल अशी यामागील संकल्पना आहे.

# पर्यावरण संवेदशनशिल क्षेत्रातील इमारत बांधकाम परवानग्या आता राज्य शासनाकडून मिळणार



## गेली ६ महिने रखडलेले अनेक नवीन आणि पुनर्विकास प्रकल्प लागणार मार्गी

### खासदार नरेश म्हस्के, शिवसेना जिल्हा प्रमुख किशोर पाटकर यांच्या प्रयत्नांना यश

**ठाणे :-** इमारत बांधकाम, टाऊनशिप आणि नागरी, प्रादेशिक विकास प्रकल्पांसाठी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने २९ जानेवारी २०२५ रोजी एक अधिसूचना जारी करून दिलासा दिला आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई , मीरा भाईंदर व राज्यातील अनेक शहरांमध्ये अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान आणि एमआयडीसीच्या ५ किलोमीटर परिघातील (पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र) २०,००० चौरस मीटर ते १,५०,००० चौरस मीटर बिल्टअप विकास क्षेत्र असलेल्या प्रकल्पांना आता राज्य शासनाच्या पर्यावरण सनियंत्रण समितीकडून बांधकाम परवानग्या मिळणे सोईचे होणार आहे. खासदार नरेश म्हस्के यांनी यासाठी केंद्रीय पातळीवर केलेल्या पाठपुराव्यामुळे ही अधिसूचना निघाली आहे.

ऑगस्ट २०२४ साली राष्ट्रीय हरित लवादाच्या एका निर्णयामुळे अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान आणि एमआयडीच्या ५ किलो मिटर परिघातील २०,००० चौरस मीटर ते १,५०,००० चौरस मीटर बांधकाम क्षेत्र असलेल्या बांधकाम प्रकल्पांना केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या परवानग्या घेणे आवश्यक असल्याचे म्हटले होते. मात्र या निर्णयाबाबत संदिग्धता असल्याने गेली ६ महिने राज्यातील अनेक बांधकाम विकास प्रकल्प रखडले होते. खासदार नरेश म्हस्के, शिवसेना नवी मुंबई जिल्हाप्रमुख किशोर पाटकर यांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याशी संवाद साधत मार्ग काढण्याची विनंती केली होती.

खासदार नरेश म्हस्के यांच्या पाठपुराव्याला यश येत २९ जानेवारी २०२५ रोजी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाचे संयुक्त सचिव रजत अग्रवाल यांनी या संदर्भात राजपत्रीय अधिसूचना जारी केली आहे. आता २०,००० चौरस मीटर ते १,५०,००० चौरस मीटर बिल्टअप विकास क्षेत्र असलेल्या बांधकाम प्रकल्पांना राज्य शासनाच्या पर्यावरण सनियंत्रण समितीकडून परवानग्या घ्याव्या लागणार आहे.

या निर्णयामुळे मुंबई, ठाणे, नवी मुंबई , मीरा भाईंदर व राज्यातील अनेक शहरांतील बांधकाम विकास, नागरी प्रकल्प मार्गी लागणार आहेत. या निर्णयामुळे केवळ विकासकांना दिलासा मिळाला नसून अनेक फ्लॅट खरेदीधारक, पुनर्विकास प्रकल्पांतील रहिवासी यांचाही फायदा होणार असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली.

यासाठी सहकार्य करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय पर्यावरण ,वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव ,खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे खासदार नरेश म्हस्के, किशोर पाटकर यांनी जाहीर आभार मानले आहेत.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५

www.diwanews.com

# गायमुख चौपाटीवर बंद बोटीला आग




**ठाणे:** घोडबंदर रोडवरील गायमुख खाडी जवळ चौपाटी शेजारी बंद ठेवलेल्या २८ फूट लांब १० फुट रुंद अशा एका बोटीला अचानक शनिवारी दुपारी साडे अकरा ते पावणे बारा वाजण्याच्या सुमारास आग लागली. ती आग जवळपास सव्वा तासांनी नियंत्रणात आणण्यात स्थानिक नागरिकांसह अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले असून यामध्ये त्या बोटीच्या आतील भागाला आग लागल्याने मोठया प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने यामध्ये कोणतीही जिवीतहानी किंवा दुखापत झालेली नाही. मात्र त्या आगीचे कारण अद्यापही समजू शकलेले नाही अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

ठाणे, घोडबंदर रोडवरील गायमुख खाडी जवळ बोटीला आग लागल्याची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन या विभागांनी धाव घेतली. घटनास्थळी दाखल झाल्यावर तेथील स्थानिक नागरिकांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन या विभागाच्या कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. तेव्हा कुठे ती आग सव्वा तासांनी म्हणजे दुपारी एक वाजण्याच्या सुमारास नियंत्रणात आली. ती बोट फायबरची असल्याने त्या बोटीच्या आतील भाग जळून खाक झाला आहे. ती बोट अतिक सय्यद यांच्या मालकीची आहे. यावेळी एक फायर वाहन आणि एक रेस्क्यू वाहन पाचारण करण्यात आले होते. मात्र आगीचे कारण समजू शकले नसल्याचे आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी सांगितले.

# दातीवली तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा मनसेचा आरोप



**दिवा :–** दातिवली तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप करत दिवा मनसेने तलावाच्या कामाबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच तलावाचा कोणताही भाग बुजवून खाजगी वापरासाठी त्याचा वापर होऊ नये असेही मनसेचे प्रकाश पाटील यांनी यावेळी म्हटले आहे. दातिवली तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला होता. या संदर्भात मनसेचे प्रकाश पाटील यांनी प्रशांत गावडे यांच्यासह तलावाच्या ठिकाणी भेट देऊन आज संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला.

**दिव्यातील मुंब्रादेवी कॉलनीतील भोलेनाथ कॉम्प्लेक्स येथील भोलेनाथ मित्र मंडळाच्या वतीने माघी गणेशोत्सव आयोजित करण्यात आला होता. तसेच तुळजा भवानी पारंपारिक वारकरी दिंडी भजन मंडळ कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते. माघी गणेश जयंती निमित्त भाविकांनी मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी मंडळाचे कार्यकर्ते व महिला उपस्थित होते.**






# अखेर ठाणे स्मशानभूमीत माती टाकली

## अर्भकांचा दफनविधी होणार

**ठाणे :–** ठाणे शहरातील मध्यवर्ती स्मशानभूमीमध्ये मातीचा पुरवठा करण्यात येत नसल्याने येथे अर्भकांचा दफनविधी करण्यात येत नसल्याचे उघडकीस आले होते. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते संगम डोंगरे यांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर आज (दि. २८) जवाहरबाग स्मशानभूमीत माती टाकण्यात आली. त्यामुळे आता या स्मशानभूमीत मृत अर्भकांवरील अंत्यसंस्कार करता येणार आहेत.

ठाणे महानगर पालिकेकडून जवाहर बाग ही स्मशानभूमी संचालित करण्यात येत आहे. या स्मशानभूमीचे काही वर्षांपूर्वीच नूतनीकरण करण्यात आले आहे. हे नूतनीकरण करण्याआधी विद्युत आणि लाकडाच्या दाहिनी लगत लहान मुलांचा दफनविधी करण्यासाठी जागा ठेवण्यात आली होती. हिंदू धर्मात दोन ते तीन वर्षांपर्यंतच्या मृत बालकांवर दहनसंस्कार न करता त्यांना दफन करण्यात येत असते. मात्र, या स्मशानात मातीचा पुरवठाच केला जात नसल्याने येथील दफनविधी अनेक वर्षांपासून बंद होता. परिणामी, लहान अर्भकांचे पार्थिव घेऊन कळव्यातील मनिषा नगर येथील स्मशानभूमीत जावे लागत होते.

या प्रकरणी संगम डोंगरे यांनी ठामपा मुख्यालयासमोर माती आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर पालिका प्रशासन आणि स्मशानभूमी संचालन करणाऱ्यांनी या स्मशानात मातीचा पुरवठा करण्यास मान्यता दिली. आज या स्मशानभूमीत मोठ्या प्रमाणात माती टाकण्यात आली आहे. त्यामुळे येथे मृत अर्भकांचा दफनविधी करणे शक्य होणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक–सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५
पान : ३
www.diwanews.com



# ठाणे मनोरुग्णालयात रुग्णांसाठी खेळीयाड !



## क्रिकेट, रस्सी खेच, लगोरी, संगीत खुर्ची कॅरम, आदी क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**ठाणे :** एखादा मोठा आघात अथवा इतर कारणांनी मानसिक स्वास्थ्य ढासळलेल्या व्यक्तीला सांभाळणे ही तारेवरची कसरत असते... उपचारासाठी मनोरुग्णालयाचा मोठा आधार असला तरी अशा व्यक्तींसाठी कौटुंबिक मायेचा ओलावा आणि सांघिक खेळाच्या जोडीने मानसिक आजारातून व्यक्ती समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी मदतगार ठरू शकते. हाच धागा पकडून ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयात मनोरुग्णांसाठी खेळीयाड २०२५ आयोजन करण्यात आले असून यावेळी क्रिकेट, रस्सी खेच, लगोरी, संगीत खुर्ची, कॅरम, आदी खेळांचे आयोजन करण्यात आले आहे.

ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयात आठवडाभर चालणाऱ्या खेळ महोत्सवात मनोरुग्ण, रुग्णालय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या मैदानी आणि इंडोर गेम्स स्पर्धा रंगणार आहेत. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नेताजी मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या क्रीडा स्पर्धांमध्ये धावणे, बुक बॅलंसिंग, बटाटा शर्यत, कॅरम, रिंग टारगेट, संगीत खुर्ची क्रिकेट, रस्सीखेच आदी खेळ खेळले जाणार असल्याची माहिती व्यवसाय उपचार तज्ज्ञ सुधीर पुरी यांनी दिली खेळीयाड २०२५ च्या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नेताजी मुळीक यांच्या हस्ते करण्यात आले. या खेळीयाड मध्ये क्रीडास्पर्धा बरोबर सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल बघायला मिळणार आहे. या प्रसंगी वैद्यकिय उपअधीक्षक डॉ प्राची चिवटे, डॉ. ममता आळसपुरकर, डॉ. अर्चना गडकरी, मुख्य प्रशासकीय अधिकारी गजानन लांजेवार, डॉ. सुरभी रानडे, डॉ. विजया खांडेपारक सुधीर पुरी, , सुनील कोर, नितीन शिवदे. आदी मान्यवर उपस्थित होते. आदी उपस्थित होते.

**११ फेब्रुवारी १८९५ हा रुग्णालयाचा स्थापना दिवस असल्याकारणाने, दरवर्षी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात रुग्णालयातील सुधारणाऱ्या रुग्णांसाठी विविध मैदानी खेळांचे व वैयक्तिक खेळाचे आयोजन केले जाते. यासाठी नियोजन समिती , अर्थ समिती ,सांस्कृतिक समिती, स्वागत समिती आणि क्रीडा इत्यादी समित्यांची स्थापना करण्यात आली आहे रुग्णालयातील पुरुष विभागातील १३ कक्ष, व महिला विभागातील १० कक्ष मध्ये विविध प्रकारचे खेळ खेळले जाणार आहेत.**

**- डॉ. नेताजी मुळीक** (वैद्यकिय अधीक्षक, ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालय)

---

# जुन्या ठाण्याच्या टँकर मुक्तीसाठी कृती आराखडा



## आमदार संजय केळकर यांच्या सूचनेनंतर अधिकारी लागले कामाला

**ठाणे :** घोडबंदरसह उर्वरित ठाण्याची पाणी टंचाई दूर होण्यासाठी अतिरिक्त ५० एमएलडी पाण्यासाठी पाठपुरावा सुरू असतानाच आमदार संजय केळकर यांनी जुन्या ठाण्याच्या टँकरमुक्तीसाठी महापालिकेत अधिकाऱ्यांशी चर्चा करून सूचना केल्या. त्यानुसार कृती आराखडा तयार करण्यात आला असून अधिकाऱ्यांनी जुन्या ठाण्यातील विविध भागात भेटी देऊन उपाय योजना करण्यास सुरुवात केली आहे.

विस्तारत असलेल्या घोडबंदर भागासह उर्वरित ठाण्यात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात भेडसावत असून संपूर्ण घोडबंदर टँकरच्या पाण्यावर तहान भागवत असल्याचे दिसत आहे. ठाण्याची पाणीटंचाई दूर करण्यासाठी आमदार संजय केळकर यांनी ठाणे आणि मुंबई महापालिकेच्या आयुक्तांबरोबर चार बैठका घेतल्या. उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेही याबाबत चर्चा केली. त्यामुळे अतिरिक्त ५० एमएलडी पाणी ठाण्याला देण्याचा मार्ग मोकळा झाला असला तरी तातडीने २५ एमएलडी पाणी मिळण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे श्री.केळकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

घोडबंदरबरोबरच जुन्या ठाण्याला पाणीटंचाई भेडसावत आहे. खारकर आळी, धोबी आळी, चरई, लोकमान्य आळी आदी भागात सुमारे दीड लाख लोकसंख्या असून दररोज या भागात टँकरने पाणी पुरवले जाते.

जुन्या ठाण्यातील पाणीटंचाई दूर करून हा भाग टँकरमुक्त करण्यासाठी आमदार संजय केळकर यांनी महापालिका मुख्यालयात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि सूचना केल्या. याबाबत कृती आराखडा तयार करण्यात आला असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संबंधित भागात भेटी देऊन उपाययोजना सुरू केल्याची माहिती केळकर यांनी दिली. काही भागात जलवाहिन्या तुंबल्याने तर काही ठिकाणी वाहिन्या तुटल्याने पाणी पुरवठा अपुरा होत आहे. या वाहिन्या दुरुस्त करण्याची आणि काही ठिकाणी बदलण्याची गरज आहे. त्यानुसार चरईत जलवाहिनी बदलण्याचे काम सुरू झाले असल्याचे श्री.केळकर यांनी सांगितले.

सरसकट सफाई कामगारांना वारसा हक्काचा लाभ देण्याचा लढा यशस्वी झाला आहे. न्यायालयाने आदेश दिले असले तरी परिपत्रक निघाले नव्हते. संबंधित विभागाकडे पाठपुरावा केल्यानंतर काल हे परिपत्रक काढण्यात आले. त्याची प्रत महापालिकेला दिली असून खऱ्या अर्थाने सफाई कामगारांना वारसा हक्काचा लाभ मिळणार असल्याचे केळकर म्हणाले.

दम्माणी इस्टेट येथील पोस्ट कार्यालय असलेल्या इमारतीचा पुनर्विकास झाला आहे. टपाल कार्यालयाला जोपर्यंत येथे जागा मिळत नाही तोपर्यंत विकासकाला ओसी देण्यात येऊ नये, अशी सूचना पालिकेला केली असल्याचे श्री.केळकर यांनी सांगितले. वर्तकनगर येथील टपाल कार्यालय बेसमेंटमध्ये असल्याने नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. महापालिकेने या कार्यालयासाठी सुसज्ज जागा देऊ केली आहे. वागळे इस्टेट येथे कार्यालयच नाही. बाळकुम येथील कार्यालयाचे देखील सक्षमीकरण करण्यात येणार आहे. टपाल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन काही निर्णय घेण्यात आले आहेत. सर्वसामान्य जनतेला सेवा देणारी सर्व टपाल कार्यालये येत्या सहा महिन्यांत सक्षम करण्यात येणार असल्याचे श्री. केळकर यांनी सांगितले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५



www.diwanews.com

# एसटी प्रवाशांनी यूपीआयद्वारे तिकिटाचे पैसे द्यावे

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आवाहन



**मुंबई :** प्रवाशांच्या तक्रारी व वाहकांना होणारा त्रास यांची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दखल घेऊन सुट्ट्या पैशावरून वाहक आणि प्रवाशांमध्ये वाद होऊ नये, यासाठी एसटीने प्रवाशांनी यूपीआय पेमेंटद्वारे तिकिटाचे पैसे देण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रवाशांचा भरघोस प्रतिसाद मिळत असून मागील काही दिवसांपासून युपीआय पेमेंट द्वारे मिळणारे उत्पन्न दुपटीने वाढले आहे.

याबरोबरच महामंडळाने परिपत्रक काढून वाहकांना कर्तव्यावर जाण्यापूर्वी अग्रधन रकमेमध्ये १०० रुपयापर्यंत सुट्टे पैसे देण्याची निर्देश स्थानीक प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे वाहक आणि प्रवासी यांच्यातील सुट्ट्या पैशावरुन होणारे वाद टाळले जाऊ शकतात. एसटी महामंडळाने प्रत्येक वाहकाकडे अँड्रॉइड इलेक्ट्रॉनिक तिकीट इशू मशीन (ETIM) दिले आहेत. या मशीनच्या माध्यमातून यूपीआय पेमेंट द्वारे तिकीट काढले जाऊ शकते. त्यामुळे प्रवाशांनी तिकीट काढताना या यूपीआय पेमेंटचा वापर केल्यास सुट्ट्या पैशामुळे होणारे वाद टाळता येतील, अशी सूचना मंत्री श्री. सरनाईक यांनी केली होती. त्यानुसार महामंळाने युपीआय पेमेंट वाढविण्यासाठी प्रयत्न केला.

गेल्या काही दिवसांमध्ये युपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढणाऱ्यां प्रवाशांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली असून मागील काही दिवसांच्या तुलनेमध्ये युपीआय पेमेंट द्वारे मिळणारे उत्पन्न दुपटीने वाढले आहे. तसेच एका परिपत्रकाद्वारे सूचना देऊन वाहकांना कर्तव्यावर जाण्यापूर्वी आग्रधन म्हणून सुट्टे पैसे देण्यात यावेत, अशा सूचना महामंडळाने स्थानिक प्रशासना दिल्या आहेत. भविष्यात वाहक आणि प्रवासी यांच्यामध्ये सुट्ट्या पैशावरून वाद उद्भवणार नाहीत, याची काळजी महामंडळाने घ्यावी, अशी सूचना परिवहन मंत्री सरनाईक यांनी केले आहे.





**दरवर्षीप्रमाणे यंदाही १ फेब्रु. २०२५ रोजी दिव्यातील गणपत निवास सोसायटीतर्फे सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. सोसायटीचे सर्व सदस्य याप्रसंगी उपस्थित होते. तसेच महिला सदस्यांनी हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमात महिलांनी गर्द केली होती.**

# विद्यार्थ्यांना आहारात अंडा पुलाव, गोड खिचडी, नाचणी सत्व देण्याचाही शाळांना पर्याय

**मुंबई :** केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील पात्र शाळांमधील पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. केंद्र शासनाने योजनेंतर्गत लोकसहभाग वाढवून विद्यार्थ्यांना पौष्टिक व वैविध्यपूर्ण आहार पुरविण्यासाठी शाळांमध्ये स्नेहभोजन उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या उपक्रमांतर्गत शालेय व्यवस्थापन समितीस शक्य असल्यास अंडा पुलाव व गोड खिचडी, नाचणी सत्व याचा लाभ देण्याबाबतचा पर्याय शाळांना देण्यात आला असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पहिली ते पाचवीच्या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त तसेच सहावी ते आठवीच्या उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. केंद्र शासनाने सद्य:स्थितीत प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी ५.४५ रुपये आणि उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी ८.१७ प्रतिदिन प्रति विद्यार्थी आहार खर्च मर्यादा निश्चित केली आहे.

केंद्र शासनाने या योजनेंअंतर्गत विद्यार्थ्यांना आहाराचा लाभ देण्यासाठी स्थानिक उपलब्ध होणाऱ्या अन्नपदार्थांचा व तृणधान्याचा समावेश करण्याबाबतच्या शक्यता पडताळून पाहण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने या उद्देशाने आरोग्य, आहार, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीनुसार दि. ११ जून २०२४ च्या शासन निर्णयान्वये विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात विविधता आणण्यासाठी विद्यार्थ्यांना तीन संरचित आहार पद्धतीप्रमाणे म्हणजेच तांदूळ, डाळी/ कडधान्यापासून तयार केलेला आहार, मोड आलेले कडधान्य (स्प्राऊटस) आणि गोड पदार्थ म्हणून तांदळाची खीर व नाचणीसत्व यांचा समावेश करुन नवीन पाककृती निश्चित करण्यात आली होती.

या पाककृतीमध्ये सुधारणा करण्याकरिता लोकप्रतिनिधी, केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे आहाराचा पुरवठा करणाऱ्या नागरी भागातील संस्था/ बचत गट, योजनेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या संघटनांची निवेदने प्राप्त झाली होती. ही निवेदने तसेच केंद्र शासनाने निश्चित केलेल्या प्रति दिन प्रति विद्यार्थी आहार खर्चाची मर्यादा विचारात घेता, पाककृती सुधार समितीने शिफारस केलेल्या पाककृतींचा समावेश करुन तसेच, सुधारित पाककृतीनुसार लाभ देण्याबाबतचा दि. २८ जानेवारी २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

या शासन निर्णयातील पाककृतींमधील अनु.क्र. ११ (अंडा पुलाव) व अनु.क्र. १२ (गोड खिचडी/ नाचणी सत्य) या पाककृती पर्यायी स्वरुपात देण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीमधून यापूर्वी विद्यार्थ्यांना अंडी/ केळी उपलब्ध करुन देण्यात आली होती. केंद्र शासनामार्फत तृणधान्यातील पौष्टिकतेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी या योजनेअंतर्गत तृणधान्याचा वापर वाढविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत पेसा क्षेत्रातील व आकांक्षित जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना अधिक पौष्टिक आहाराचा लाभ देण्यासाठी मिलेट बार उपलब्ध करुन देण्याचे निर्देशही केंद्र शासनाकडून प्राप्त होते. त्यानुसार संबंधित जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत आठवड्यातून किमान एक दिवस फळे, सोयाबिस्कीट, दूध, चिक्की, राजगीरा लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाणे, चुरमुरे आदी स्वरुपात पूरक आहार देण्यात येत असल्याचेही शालेय शिक्षण विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५
www.diwanews.com


# खड्डयांबाबत महापालिका प्रशासणाची जागृता!

## सर्व प्राधिकरणांनी कामे ३० एप्रिलपर्यंत पूर्ण करावीत -आयुक्त सौरभ राव



### महापालिका, मेट्रो प्राधिकरण व वाहतूक पोलीसांच्या बैठकीत मान्सूनपूर्व कामांचा आढावा

**ठाणे :** मान्सूनपूर्व कामे वेळेत व्हावी व सर्व यंत्रणांचा परस्पर संबंध असावा, यासाठी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी गुरुवारी सर्व विभागांची बैठक आयुक्त दालनात आयोजित केली होती. महापालिका कार्यक्षेत्रात पावसाळ्यात खड्डयामुळे वाहतूक कोंडी होवू नये यासाठी रस्त्यांची सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत. तसेच खड्डे पडण्याची जी ठिकाणे आहेत त्या ठिकाणी पाहणी करुन सर्व कामे ३० एप्रिलपर्यत करावीत, त्याचप्रमाणे मान्सून कालावधीत काही कारणास्तव खड्डे पडले तर ते तात्काळ दुरूस्त करण्यासाठी यंत्रणा सज्ज असेल या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना आयुक्तांनी या बैठकीत दिल्या.

या बैठकीस महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, वाहतूक विभाग, मेट्रो प्राधिकरण, एमएमआरडीए आदी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महापालिका कार्यक्षेत्रातील मान्सूनपूर्व कामांसंदर्भात नियोजन समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सूचना करण्यात आल्या. त्या अनुषंगाने सर्व प्राधिकरणाने आपल्या अखत्यारितील कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत जेणेकरुन पावसाळ्यात कोणत्याही समस्येला नागरिकांना सामोरे जावे लागणार नाही या दृष्टीने रहावे असे निर्देश आयुक्त श्री. राव यांनी दिले.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात दरवर्षी ज्या ठिकाणच्या रस्त्यांवर, उड्डाणपुलावर खड्डे पडतात त्या ठिकाणी प्रभागसमिती निहाय कार्यकारी अभियंत्यांनी तेथे कॉंक्रिटीकरण किंवा अत्याधुनिक पध्दतीने अधिक गुणवत्तापूर्वक काम होईल किंवा कसे हे पहावे. शहरात विविध ठिकाणी मेट्रो प्राधिकरणामार्फत सुरू असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण होतील या दृष्टीने कार्यवाही करावी. तसेच ज्या ज्या ठिकाणी डेब्रीज पडलेले आहे ते तात्काळ उचलून रस्त्याचा पृष्ठभाग समतोल करण्याच्या सूचनाही आयुक्त श्री. राव यांनी यावेळी दिल्या.

तसेच मान्सूनच्या अनुषंगाने करावयाच्या कामांसाठी पाहणी करुन करावयाच्या कामांचा आढावा घेणे. ज्या ठिकाणी मेट्रोच्या स्टेशनची कामे सुरू आहेत, पैकी पूर्ण झालेल्या कामाच्या ठिकाणचे बॅरिगेट्स उचलण्यात यावे. माजिवडा, कासारवडवली, गायमुख, डोंगरीपाडा, आनंदनगर, ओवळा जंक्शन, वाघबीळ, कांचनपुष्प सोसायटी, हायपरसिटी मॉल, कासारवडवली फ्लायओव्हर आदी ठिकाणी मेट्रोच्या गर्डरखाली काम पूर्ण होवून जेथे डेब्रीज पडलेले असल्याचे दिसून येते ते तात्काळ यावे, तसेच मेट्रो मार्गावर उभारण्यात आलेल्या सर्व पिलरची पाहणी करुन ज्या ठिकाणी खड्डे असतील ते योग्य पध्दतीने बुजविण्याची कार्यवाही करण्याच्या सूचनाही आयुक्त श्री सौरभ राव यांनी या बैठकीत दिल्या.

त्याचप्रमाणे तत्वज्ञान विद्यापीठ ते मानपाडा जंक्शन येथील सर्व्हिस रस्त्याचे डांबरीकरण करणे, दोस्ती ईम्पीरियासमोर पाणीपुरवठा विभागामार्फत जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू असून ते लवकरात लवकर पूर्ण होईल या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी बैठकीत दिल्या.

महापालिका कार्यक्षेत्रात नागरी विकासातंर्गत सुरु असलेली प्रकल्प कामे निधीअभावी पुर्णत्वास गेलेली नाही अशा कामांबाबतचा अहवाल संबंधित प्राधिकरणांनी तयार करावा. परिवहनमंत्री व स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांच्याकडे आवश्यक निधीबाबत मागणी करुन सदरची कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करता येईल असेही आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

एकूणच विविध प्राधिकरणांमार्फत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत मान्सूनपूर्व कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व प्राधिकरणांनी समन्वयाने कामे करण्याचेही आयुक्त सौरभ राव यांनी सूचित केले.

# मनसेने आवाज उठवल्यावर सिडकोला आली जाग

## अभियंता भरतीत मराठी विषय केला समाविष्ट

## मनसेचे संदीप पाचंगे यांच्या पाठपुराव्याला यश

**ठाणे –** सिडको महामंडळामध्ये सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील एकूण १०१ रिक्त पदे भरण्यासाठी मागील वर्षी ऑनलाईन अर्ज मागविले होते. सदर परीक्षेकरिता असलेल्या अभ्यासक्रमातून मराठी विषय वगळल्याची तक्रार काही मराठी इच्छुक उमेदवारांनी मनसेचे संदीप पाचंगे यांच्याकडे केली होती. संदीप पाचंगे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे अखेर मराठी विषय परीक्षा प्रक्रियेत समाविष्ट केल्याची अधिसूचना सिडको प्राधिकरणाने काढली आहे.

सिडको महामंडळाने १८ जानेवारी २०२४ रोजी सहाय्यक अभियंता ( स्थापत्य) या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली होती. इंग्रजी, सामान्यज्ञान, आकलन क्षमता, व्यावसायिक ज्ञान हे परिक्षेचे विषय देण्यात आले होते. एकूण २०० गुणांच्या या परिक्षेत मराठी हा विषय वगळण्यात आला होता. याबाबत इच्छूक मराठी उमेदवारांनी मनसेचे संदीप पाचंगे यांच्या कडे तक्रार केली होती. पाचंगे यांनी तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी व संबंधित प्राधिकरणाशी पत्रव्यवहार केला होता. अखेर संदीप पाचंगे यांच्या पाठपुरव्याला यश आले आहे. सिडको प्राधिकरणाने ९ जानेवारी २०२५ रोजी एक शुद्धीपत्रक काढत मराठी विषय परिक्षेत समाविष्ट केल्याचे जाहीर केले आहे. मराठी विषय समाविष्ट करण्यासाठी पाठपुरवठा करणाऱ्या संदीप पाचंगे यांचे मराठी उमेदवारांनी आभार मानले आहेत.

सहाय्यक कार्यकारी अभियंता पदासाठी मराठी विषय वगळल्याची तक्रार काही मराठी इंजिनिअर तरूणांनी माझ्याकडे केली होती. तसेच म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशन, मुंबई यांनी देखील मराठी विषय समाविष्ट करण्याची मागणी सिडकोकडे केली होती. यापूर्वी मराठी विषय समाविष्ट होता मात्र काही अधिकाऱ्यांनी मुद्दाम हा खोडसाळपणा केल्याचे निदर्शनास आले म्हणून त्यांची तक्रार तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या व सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे केली होती. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळून ही शासन दरबारीच अशी उपेक्षा मनसे कदापि खपवून घेणार नाही अशी प्रतिक्रिया संदीप पाचंगे यांनी दिली आहे.



**भारतीय जनता पार्टी दिवा शहर यांच्या वतीने नागरिकांसाठी तीन दिवसीय भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नवीन आधार कार्ड, ज्येष्ठ नागरिक सर्टिफिकेट, ५४९ रुपया मध्ये दहा लाखाचा अपघाती विमा, नवीन मतदार नोंदणी इत्यादी उपक्रम राबवण्यात आले. शहरातील नागरिकांनी भारतीय जनता पार्टी आयोजित या शिबिराला उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला.**

# बेतवडे येथील १५ वर्षे बंद साठवण टाक्यांचे पूजन करून पाणी समस्या सुटण्यासाठी साकडे घालणार - ज्योती पाटील

## ठाकरेंच्या शिवसेनेच्या वतीने पाण्यासाठी दिव्यात होणार अनोखे आंदोलन

**दिवा (प्रतिनिधी):- दिवा शहरात कमी दाबाने पाणी पुरवठा होण्यास साठवण टाक्या सुरू नसणे हे कारण असून पाणीटंचाईस कारण असणाऱ्या बेतवडे येथील बंद स्थितीतील जल कुंभाचे पूजन करून पाणी समस्या सुटण्यासाठी गाऱ्हाणे घालण्याचा इशारा ठाकरेंच्या शिवसेनेच्या महिला संघटिका ज्योती पाटील यांनी पालिका प्रशासनाला दिला असून या अनोख्या आंदोलनाच्या माध्यमातून ठाकरेंची शिवसेना पालिका आयुक्तांचे दिव्यातील पाणी प्रश्नाकडे लक्ष वेधणार आहे.**

ज्योती पाटील यांनी पालिका आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की,दिवा शहरात अंतर्गत जलवाहिन्या न टाकल्या गेल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा आजही सामना करावा लागत आहे. दिवा शहरासाठी नवीन पाणी योजना अस्तित्वात येऊनही पाणीटंचाईचा प्रश्न सुटलेला नाही. मनमानी पद्धतीने पाणीपुरवठा विभागाने पाणीपुरवठा लाईन



टाकल्याने हा प्रश्न अधिक गंभीर झालेला आहे. अंतर्गत जलवाहिन्या टाकण्याबरोबरच दिवा शहरात जल कुंभ उभारणे आवश्यक होते. मात्र महापालिका प्रशासनाने मागील काही वर्षात येथे नव्याने जलकंभ उभारले नाहीत. जागा उपलब्ध नसल्याचे कारण पालिका प्रशासन देते मात्र दुसरीकडे दिवा शहरात २०१२ पूर्वी उभारण्यात आलेले बेतवडे येथील दोन जलकुंभ वापराविना बंद स्थितीत आहेत. यावर महापालिकेचा करोडोंचा निधी खर्च झालेला आहे. चुकीच्या पद्धतीने बांधलेल्या या जलकुंभ मुळे दिवा शहरासाठी पाणीपुरवठा होऊ शकत नाही अशी स्थिती असल्याकडे ज्योती पाटील यांनी लक्ष वेधले आहे. महापालिकेच्या निधीचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणे गरजेचे आहे. या दोन जल कुंभांकडे लक्ष वेधण्यासाठी पाणीटंचाईचे स्मारक असणाऱ्या या दोन्ही जल कुंभाचे पूजन दिवा शहरातील महिलांच्या वतीने आम्ही करणार आहोत असा इशाराही ज्योती पाटील यांनी पालिका प्रशासनाला दिला आहे.

आपण लक्ष न दिल्यास लवकरच दिवा शहरातील महिला या बंद स्थित असणाऱ्या जलकुंभाचे पूजन करून दिवा शहराला मुबलक पाणीपुरवठा होण्यासाठीचे गाऱ्हाणे घालणार आहेत.

तरी आपण दिवा शहरातील नागरिकांच्या या गंभीर समस्येची नोंद घ्यावी व सदर जलकुंभ तातडीने सुरू करावेत अशी विनंती ज्योती पाटील यांनी या पत्रात केली आहे.

# मुंबई महापालिकेतील माजी नगरसेविका राजूल पटेल शिवसेनेत




## मुंबईसह नाशिक,कोल्हापूर, सांगली, जळगावमध्ये शिवसेना ठाकरे गटाला खिंडार

**ठाणे :** मुंबई महापालिकेतील उबाठा गटाच्या माजी नगरसेविका आणि महिला संघटक राजूल पटेल यांनी सोमवारी शिवसेनेत प्रवेश केला. याचबरोबर राज्यभरातील शिवसेना ठाकरे गटाच्या शेकडो पदाधिकारी आणि हजारो कार्यकर्त्यांनी धर्मवीर आनंद दिघे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून ठाण्यातील स्वर्गीय आनंद दिघे यांचे समाधीस्थान असलेल्या शक्तीस्थळावर शिवसेना मुख्यनेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.

मुंबई महापालिकेच्या माजी नगरसेविका आणि शिवसेना ठाकरे गटाच्या महिला संघटक राजूल पटेल, विलेपार्लेचे शाखाप्रमुख सुनील भागडे, वरळीतील सुरेश कोठेकर आणि रोशन पावसकर यांच्यासह ४० पदाधिकारी आणि ५० कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. शिवाजी नगर, मानखुर्द येथील कार्यकर्ते तसेच उत्तर मध्य मुंबईमधील अशोक लोखंडे यांच्यासह २० पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला. त्याचबरोबर मीरा भाईंदर महापालिकाचे माजी उपमहापौर प्रवीण पाटील, जयंती पाटील, अरविंद ठाकूर, शिवशंकर तिवारी यांच्यासह माजी नगरसेवकांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. या पक्ष प्रवेशाने मुंबई आणि उपनगरात शिवसेनेचे पक्ष संघटन आणखी मजबूत झाली आहे.

कोल्हापूर जिल्हातील प्रदेश जनरल सेक्रेटरी सुजीत समुद्रे, प्रमोध धनावडे, शीतल कांबळे, उल्हास वाघमारे, किरण कांबळे, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला. सांगली जिल्ह्यातील प्रदेश जनरल सेक्रेटरी प्रशांत कांबळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते तसेच नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, मालेगाव शहापूरमधील २०० कार्यकर्ते, शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार काशिनाथ मेंगाळ यांनी शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेते पक्ष प्रवेश केला. याशिवाय नाशिक शिक्षक सेना, जळगाव शिक्षक सेनेतील शेकडो सदस्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला.

राजुल पटेल या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या आहेत. त्या विधानसभेच्या महिला संघटक आणि माजी नगरसेविका आहेत. पक्षातील जुन्या महिला शिवसैनिक म्हणून राजुल पटेल यांची ओळख आहे. राजुल पटेल यांनी वर्सोवा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी मागितली होती. मात्र त्यांना तिकिट नाकारण्यात आले. यापूर्वी त्यांनी विधानसभा २०१९ ची विधानसभा निवडणूक लढवली होती.

# म्हाडाच्या माध्यमातून दोन वर्षात सुमारे एक लाख घरे उभारणार
## - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
Our Passion Your Care

२५,000 ते २,00,000 पर्यंत विमा योजना



मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund

फुफ्फुस प्रत्यारोपण
हाताचे प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
अपघात शस्त्रक्रिया
विद्युत अपघात रुग्न
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
नवजात शिशुंचे आजार
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
बर्न रुग्न
अपघात
मेंदूचे आजार
हृदयरोग
कर्करोग शस्त्रक्रिया
डायलिसिस

Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301

Emergency
7777008464
9076229076

**ठाणे :–** सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी राज्य शासन कटीबद्ध असून येत्या दोन वर्षात म्हाडाच्या माध्यमातून सुमारे एक लाख घरांच्या उभारणीस सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याचे गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केले.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएसह सोलापूर जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ३,६६२ सदनिकांच्या विक्रीकरिता संगणकीय सोडत उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री तथा पुणे पालकमंत्री अजित पवार, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, म्हाडा पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृश्य प्रणालीद्वारे काढण्यात आली. यावेळी श्री. शिंदे बोलत होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, या गृहनिर्माण धोरणानुसार सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ठिकठिकाणी वसतिगृह उभारले जाणार आहेत. म्हाडा पुणे मंडळाच्या ३६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित सोडतीसाठी अनामत रकमेसह ७१,६४२ अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्जदारांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणावर (म्हाडा) दाखवलेला हा विश्वास आहे. अर्जदारांचा हाच विश्वास सार्थ ठरवण्यासाठी घरांच्या गुणवत्ता व सोडतीच्या पारदर्शकतेमध्ये कुठेही तडजोड न करता सोडतीतील विजेत्या अर्जदारांना तात्काळ सदनिकांचा ताबा देण्यात यावा. महाराष्ट्र शासन विविध योजनांच्या माध्यमातून परवडणाऱ्या घरांची निर्मिती करीत आहे.

म्हाडाने गेल्या दीड वर्षात १३ सोडतींच्या माध्यमातून सुमारे ३० हजार घरे उपलब्ध करून दिली आहेत, ही कौतुकास्पद बाब असल्याचे ते म्हणाले. रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लागावेत व झोपडपट्टी पुनर्विकास व्हावा यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात गृहसाठा उपलब्ध होणार आहे. मुंबई पुणे, ठाणे या शहरांमध्ये समूह पुनर्विकास योजनेद्वारे योजनाबद्ध गृहनिर्मिती करण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न केले जात असल्याचे शिंदे यांनी सांगितले. पुणे येथे देखील समूह पुनर्विकास योजना राबवण्याचे सुतोवाच शिंदे यांनी केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मानवी हस्तक्षेपविरहित संपूर्णतः ऑनलाइन अशा या संगणकीय प्रणालीद्वारे ही सोडत प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या नूतन प्रणालीनुसार अर्ज नोंदणीकरण व पात्रता निश्चिती झाल्यानंतरच अर्जदार सोडत प्रक्रियेत सहभागी होतो. सोडतीत विजेता ठरल्यानंतर, अर्जदारास सूचना पत्र पाठविले जाते व त्यातील तरतुदींची पूर्तता केल्यानंतर विजेत्या अर्जदारांना तात्पुरते देकार पत्र पाठविले जाते. ही सर्व प्रक्रिया अत्यंत सोपी व सुलभ पारदर्शक असून त्यासाठी कुठलाही मध्यस्थ/दलाल म्हाडाने नेमलेला नाही. म्हाडाचा लाभार्थी ही म्हाडासाठी मोठी गुंतवणूक असून सदर लाभार्थी हेच म्हाडाचे ब्रँड अँबेसिडर आहेत. सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र शासन कटीबद्ध असल्याचे पवार यांनी सांगितले.

शिवाजीराव आढळराव पाटील यांनी पुणे मंडळाने मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध करून दिल्याचे सांगितले.

म्हाडाच्या @mhadaofficial या अधिकृत यूट्यूब व फेसबूक समाजमाध्यम व्यासपीठांवरुन सोडतीचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. सदर थेट प्रक्षेपण ४८,००० जणांनी बघितले.

सोडतीमधील विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाईटवर सायंकाळी ६ वा. प्रसिद्ध केली जाणार असून विजेत्या अर्जदारांना एसएमएसद्वारेही विजेता ठरल्याबाबतची माहिती तात्काळ कळविली जाणार आहे. यावेळी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठामपा आयुक्त सौरभ राव, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखडे, म्हाडा पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे, उपमुख्य अभियंता सुनील ननावरे, अनिल अंकलगी, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी सविता बोडके, उपमुख्य अधिकारी अतुल खोडे, उपअभियंता मनीषा मोरे आदी उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५ पान : ८
www.diwanews.com

# सर्वसामान्यांच्या सोयीसाठी कळवा रुग्णालयातील आरोग्य सुविधा अद्यावत करा - राजकांत पाटील




**दिवा:–** मुंबईतील केईएम रुग्णालयाच्या धर्तीवर कळवा रुग्णालयाचा ठाणे महापालिकेने विकास करून अद्यावत उपचार सुविधा या ठिकाणी तज्ञ डॉक्टरांसह उपलब्ध करून द्यायला हव्यात. जेणेकरून ठाणे आणि जवळच्या परिसरातील नागरिकांना इमर्जन्सी वेळी मोफत उपचार या रुग्णालयामध्ये मिळतील. मात्र ठाणे महापालिका प्रशासन याकडे गांभीर्याने पहात नसल्याने आजही अनेक नागरिकांना इमर्जन्सी वेळी मुंबईच्या शासकीय रुग्णालयांकडे धाव घ्यावी लागते अशी खंत सामाजिक कार्यकर्ते आणि शिवसेना ठाकरे गटाचे राजकांत पाटील यांनी व्यक्त केली आहे.

ठाणे महापालिकेच्या आरोग्य व्यवस्थित बाबत बोलताना राजकारण पाटील यांनी म्हटले आहे, की वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरोग्य सुविधा पुरविण्यात महापालिका प्रशासन अपयशी ठरताना दिसत आहे.नागरिकांच्या गरजेनुसार अद्यावत उपचार सुविधा या महापालिकेने त्या त्या भागात उपलब्ध करून देणे गरजेचे होतं.मात्र शहरात असणारे कळवा रुग्णालय यातील सोयी सुविधा सुद्धा इमर्जन्सी वेळी नागरिकांना अपुऱ्या पडतात. अनेक नागरिकांना इमर्जन्सी वेळी मुंबईला नेण्यास सांगितले जाते ही दुर्दैवाची बाब आहे, असे राजकारण पाटील यांनी म्हटले आहे.या रुग्णालयातील सुविधा अद्यावत करून केंद्र सरकारने घोषणा केल्याप्रमाणे नव्याने होणाऱ्या कॅन्सर कक्षा पैकी कळवा येथील रुग्णालयात अद्यावत कॅन्सर कक्ष सुरू करण्यात यावा अशी ही मागणी राजकांत पाटील यांनी केली आहे.आरोग्याच्या सुविधा प्रश्नाबाबत महापालिका प्रशासनाने अधिक जागृत असणे गरजेचे असल्याचे राजकांत पाटील यांनी म्हटले आहे.

# दिव्यातील घनकचरा आणि स्वच्छता विभागाच्या भ्रष्टाचाराची विभागीय चौकशी करा - मनसे



**दिवा:–** दिवा शहरातील काही प्रमुख रस्ते सोडल्यास इतर ठिकाणी महापालिकेच्या सफाई कामगारांकडून साफसफाई होताना दिसत नाही. जागोजागी रस्त्यावर कचऱ्याचे लागलेले ढीग याची साक्ष देत असतात. यासंदर्भात स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता. अपुऱ्या मनुष्यबळाचे कारण नेहमीच दिले जाते. पण सफाई कामगारांचा हा तुटवडा म्हणजे मोठा भ्रष्टाचार असल्याचा आरोप मनसेने केला आहे. महापालिकेच्या पगारावर कार्यरत असलेले अर्ध्याहून जास्त कामगार हे कामावर उपस्थित न राहताही त्यांचे हजेरी लावली जात असल्याची आणि याबदल्यात कामगारांच्या पगारातील ठराविक रक्कम मोबदला म्हणून घेतला जात असल्याची धक्कादायक माहिती मिळाल्याचे मनसेने आपल्या पत्रात म्हटले आहे.

कंत्राटी सफाई कामगारांच्या बाबतीतही असाच प्रकार घडत असल्याचे मनसे पदाधिकाऱ्यांनी सहाय्यक आयुक्तांच्या लक्षात आणून दिले आहे. सफाई कामगारांच्या या कृत्रिम टंचाईमुळे दिवा शहरातील सर्व विभागांमध्ये साफसफाई होत नसून त्यामुळे दिवा शहरातील विविध विभागांमध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसून येते. त्यामुळे या सर्व प्रकारची विभागीय चौकशी करून या दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी मनसे पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

दिवा प्रभाग समिती मधील स्वच्छता विभागात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून त्याची विभागीय चौकशी करण्याची मागणी आज दिवा मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सहाय्यक आयुक्त भालचंद्र घुगे यांची भेट घेवून केली. यावेळी मनसेचे दिवा शहर सचिव प्रशांत गावडे, विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील, देवेंद्र भगत, उपविभाग अध्यक्ष शैलेंद्र कदम हे पदाधिकारी उपस्थित होते.




**दिवा:– दिव्यातील साबेगाव येथील आदिशक्ती केबल नेटवर्क, स्वप्न साकार बंगल्याजवळ श्री समर्थ मित्र मंडळच्या वतीने माघी गणेश जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. लाडक्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची प्रचंड गर्दी केली होती. महिलांचा हळदीकुंकू समारंभ यावेळी ठेवण्यात आला होता.याप्रसंगी श्री समर्थ मित्र मंडळाचे कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या.**

